**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या ५ व्या टप्प्यातल्या मतदारसंघांमध्ये अर्जांची छाननी पूर्ण, धुळ्यातून वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज अवैध

- निवडणूक प्रचारात नेत्यांच्या आरोप प्रत्यारोपांच्या फेऱ्या

- कांदा निर्यातीला केंद्राची सशर्त परवानगी, अनेक ठिकाणी कांद्याच्या दरात वाढ

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी आज झाली. धुळ्यामधून ३० पैकी २२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अब्दुर रहमान यांच्यासह एकूण ८ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. अब्दुर रहमान हे १९९७ च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. रहमान यांच्या सरकारी सेवेतला राजीनामा अजून मंजूर झालेला नाही. त्यामुळं त्यांचा अर्ज अवैध ठरला. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं ते म्हणाले.

**कल्याण** लोकसभा मतदारसंघातून ३० जणांचे अर्ज वैध ठरले असून ४ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले.

**नाशिकमधून** ३९ पैकी ३ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून २० पैकी ५ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. त्यात MIM कडून अर्ज भरलेल्या दोघांचा समावेश आहे.

**राज्यातल्या** १३ मतदारसंघात एकूण ३९७ उमेदवारांचे ५१२ अर्ज दाखल झाले होते. पाचव्या टप्प्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये अर्ज मागे घेण्यासाठी सोमवारपर्यंत मुदत आहे.

<><><><><>

नांदेडमध्ये मतदान केंद्रावरचा मतदान करतानाचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल करणाऱ्या तिघांविरुद्ध आचारसंहिताभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. मतदान केंद्रावर मोबाइल न्यायला बंदी असतानाही त्यांनी मतदान यंत्रांचे व्हिडीओ काढले होते.

<><><><><>

देशातले आजचे राज्यकर्ते हे शेतकरीविरोधी, युवाविरोधी, कष्टकरी-कामगार विरोधी आहेत. मूठभर लोकांच्या हिताची जपणूक करणं हेच ते कर्तव्य मानतात अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी केली आहे. सत्तेचा गैरवापर होत असल्याची अनेक उदाहरणं पहायला मिळत आहेत, असं पवार यांनी सांगितलं. महाविकास आघाडीच्या वतीनं जळगाव मधल्या मुक्ताईनगर इथं आयोजित जाहीर सभेत ते आज बोलत होते. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत गंभीर नाही या आरोपाचा पुनरुच्चार त्यांनी केला.

<><><><><>

यंदाची निवडणूक देशाचं संविधान टिकणार की नाही आणि देशांचं संरक्षण होणार की नाही हे ठरवणारी आहे, असं मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणमधल्या प्रचारसभेत व्यक्त केलं.

<><><><><>

मतांच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढून कुणी राजकारण करणार असेल तर त्याला जनता थारा देणार नाही. जनता ‘वोट जिहादचे राजकारण’ झुगारून देऊन मतांची क्रांती करून, महायुतीला पाठबळ देईल असा विश्वास भाजपाचे राज्य प्रभारी खासदार दिनेशकुमार शर्मा यांनी व्यक्त केला. अहमदनगर आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

<><><><><>

काँग्रेस पक्षानं जनतेच्या हिताचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यात शेतमालाला चांगला भाव, मजुरांना चांगली मजुरी, स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी, जातनिहाय जनगणना, महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची हमी दिल्याची माहिती काँग्रेस नेते अमित देशमुख यांनी आज लातूर जिल्ह्यातल्या निलंगा इथं जाहीर सभेत दिली.

<><><><><>

संविधान आणि आरक्षणाबाबत इंडिया आघाडीकडून दिशाभूल केली जात आहे. विरोधकांच्या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय बनसोडे यांनी आज लातूर मध्ये औसा इथं घेतलेल्या प्रचारसभेत सांगितलं. अल्पसंख्याक समाजानं कधीही असुरक्षिततेची भावना मनात आणू नये, केंद्र सरकारनं आखलेल्या कोणत्याही योजनेचे लाभ जात-धर्म बघून दिले जात नाहीत, असं ते म्हणाले.

<><><><><>

मतदार जनजागृतीसाठी राज्यात ठिकठिकाणी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

**कल्याण लोकसभा मतदारसंघात** वासुदेवाच्या मदतीनं पथनाट्य सादर करून मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं. मतदार जनजागृती पथकानं गीत वाजवून, घोषणा देऊन मतदान करण्याचा संदेश दिला.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या** वतीनं निगडीत दुचाकी रॅली काढण्यात आली. **पालघर जिल्ह्यातही** महिलांची बाईक रॅली निघाली होती. पोलिस दल, शासकीय आणि निम-शासकीय कार्यालयातल्या महिला आणि शिक्षिका या रॅलीत सहभागी झाल्या होत्या.

**कोल्हापूर आणि हातकणंगले** मतदारसंघात जिल्हा प्रशासन सार्वजनिक उद्घोषणा प्रणालीद्वारे मतदान करण्याचं आवाहन करत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात ५९५ ठिकाणी ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. तर हातकणंगले लोकसभा मतदासंघात रन फॉर वोट, मानवी साखळी आदी उपक्रम राबवले जात आहेत. शाहुवाडी तालुक्यातील नामांकित धावपटू डॉ.झुंजार माने यांनी मतदार जनजागृतीसाठी शाहूवाडी ते कोल्हापूर ५० किलोमीटर अंतराची दौड पूर्ण केली.

**<><><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण मावळ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत.

**<><><><><><>**

कांदा निर्यातीवरची बंदी केंद्र सरकारने हटवली आहे. मात्र निर्यातीसाठी प्रति टन ५५० अमेरिकन डॉलर्स किमान भाव आवश्यक राहील असं स्पष्ट केलं आहे. त्याचबरोबर कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्कही लावलं आहे.

कांदा निर्यातीवरची बंदी हटवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं नाशिकसह राज्यातल्या शेतकऱ्यांनी स्वागत केलं आहे. निर्यात बंदी उठवताच प्रमुख बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव वाढले आहेत. लासलगाव मधे आज सकाळच्या

लिलावात किमान ८०१ ते कमाल २ हजार ५५१ रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. त्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये समाधानाचं वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. कोणत्याही अटी- शर्तींशिवाय निर्यात सुरू करावी, अशी मागणी कांदा उत्पादक संघटनेनं केली आहे.

**<><><><><><>**

विकसित भारताचा पाया घालताना उच्च शिक्षणाची महत्वाची भूमिका ओळखून केंद्र सरकारनं नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आखलं आहे, असं केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज पुण्यात डेक्कन महाविद्यालय अभिमत विद्यापीठात बोलत होत्या.

**<><><><><><>**

माजी राज्यमंत्री आणि पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष गंगाधर गाडे यांचं आज पहाटे छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरच्या चळवळीत ते सक्रीय**रित्या** सहभागी होते.

**<><><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या सेनगाव ते नर्सी नामदेव महामार्गावर गिलोरी पाटीजवळ आज पहाटे एक भरधाव कार झाडावर आदळली. या अपघातात तीनजण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले. जखमींना पुढील उपचारासाठी नांदेड इथे हलविण्यात आले आहे.

**<><><><><><>**

ताडोबाच्या बफर क्षेत्रात तेंदुपत्ता गोळा करणाऱ्या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. ही महिला  कुकडहेटी उपवन परीक्षेत्रात बामणीमाल इथं तेंदूपत्ता संकलन करत होती. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनाला पाठवला.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना थोड्याच वेळात म्हणजे साडे सात वाजता बंगळुरूत एम. चिन्नस्वामी स्टेडियमवर सुरु होईल. रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

<><><><><><>

अमरावती जिल्ह्यात गेल्या आठ दिवसात कापसाच्या दरात क्विंटलमागे चारशे रूपयाची घसरण झाली, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. गेल्या आठवड्यात कापसाचे दर ७ हजार ६०० रुपये प्रति क्विंटल पर्यंत वाढले होते. हे दर साडे ८ हजार रुपयांपर्यंत वाढतील  अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. पण काल कापसाचे दर ७ हजार ५० रुपये क्विंटल पर्यंत घसरले. अद्यापही पाच टक्के शेतकऱ्यांकडे दोन ते तीन लाख क्विंटल कापूस शिल्लक असण्याचा अंदाज आहे.

<><><><><><>

विदर्भात तसंच मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. कोकणात काही ठिकाणी हवामान कोरडे राहण्याची तर तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी तापमानाचा पारा चढताच राहणार आहे. नांदेड जिल्ह्यात आज ४३.२ अंश सेल्सिअस इतकी उच्चांकी तापमानाची नोंद झाली. त्यामुळे आरोग्य विभागानं खबरदारीच्या उपायोजना हाती घेतल्या आहेत.

//<><><><><><>//